# <u>प्रेसनोट</u>

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ ३०४१ /२०१९ पुणे शहर, दिनांक २३/०३/२०१९

**विषय :- दुचाकी वाहनचालकांनी हेल्मेट परिधान करण्याचे अवाहन.**

---

पुणे शहरातील वाहतूक सुरक्षित व सुरळीत चालण्यासाठी वाहतूक शाखेकडून नियमीत प्रयत्न करण्यात येत असून, वाहनचालकांकडून करण्यात येणा-या वाहतूक नियमभंगामुळेच अनेक लहान मोठे अपघात होत असल्याचे निदर्शनास येत आहे त्यामध्ये दुचाकी वाहन चालविताना हेल्मेट परिधान न केल्यामुळे प्राणांतिक अपघात होत आहेत. शहरात दोन दिवसात,

दिनांक- २२/०३/२०१९ रोजी २३.३० वा. हॉटेल हरिओम वडगाव खुर्द चे समोर मुंबईकडून बैंगलोरकडे जाणा-या रोडवर पुणे येथे मोटार सायकल चालकास अज्ञात वाहनाने हुलकावनी दिल्यामुळे तो डगमगल्यामुळे रस्ता दुभाजकाचे लोंखडी बॅरीअरला धडकुन रस्त्याचे मध्यभागी पडून गंभीर जखमी होऊन मयत झाला आहे.

तसेच दिनांक- २३/०३/२०१९ रोजी रात्रौ ००.३० वा. सुमा. लोहीया जैन आयटी पार्क समोर मुंबई बैंगलोर हायवेवर पादचारी इसम हा रस्ता क्रॉस करीत असताना त्यास कारने धडक दिल्याने पादचारी इसम हा गंभीर जखमी होऊन मयत झाला आहे.

तरी वाहनचालकांना आवाहन करण्यात येते की, वाहन चालविताना वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष केल्याने आपल्या स्वताचे तसेच दुस-याचे जिवीतास धोका निर्माण होतो त्याकरीता वाहतूकीच्या नियमांचे तंतोतंत पालन करून शहरातील वाहतुक सुरळीत करण्यात योगदान द्यावे तसेच दुचाकी वाहन चालविणा-या चालकाने व दुचाकीवरील सहप्रवाशी यांनीही आपल्या जिवीताचे सुरक्षीतता करीता हेल्मेट परिधान करावे.